# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. समिता सिताराम पारधिये

---

आनंद देऊ, आनंद घेऊ,
आनंदी होऊ, स्वानंदी होऊ ||धृ||

झेलून घ्याव्या सुखाच्या सरी
वाहू दे नसानसांत भक्ती ईश्वरी
येवो कितीही संकटे जरी
सद्भावना ही राहू दे उरी ||१||

होऊया स्वच्छंदी फुलपाखरू
मना मनाला आपुलेसे करू
हितगुज व्हावे मनांचे मनांशी
आणि करूया उधळण आनंदाची ||२||

देहाची देण ही मानवा तुला
झुलू दे तुझ्या सदगुणांचा झुला
सामर्थ्य लाभो तुझ्या बुद्धीला
रक्षिण्या या सकल या भूमातेला ||३||

संगीत जीवनाची आहे मुळी
झटकून टाकी अंतरीची काजळी
संपून जाई निराशा मनाची
आणि फुलविते बाग आनंदाची ||४||

Arhat Music Therapy